| MHSN060005912014 | **नियमित दिवाणी दावा क्र.१३४/२०१४**<br>श्री. संभाजी श्रीपती भगत वि.<br>श्री. श्रीपती गणू भगत वगैरे |
|---|---|

## नि.क्र.६२ वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. वादीचा नि.क्र.६२ वरील अर्ज वाचला.

**२.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता व जाहीर होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादीचे कथनानुसार प्रस्तुत दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.६ यांनी केलेले खरेदीपत्र बेकायदेशीर असल्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता प्रस्तुत अर्ज त्यांनी दाखल केला आहे.

**३.** सदर अर्जाद्वारे वादीने दावेच्या टायटलमध्ये प्रतिवादी नं. ६ नंतर प्रतिवादी नं. ७ व ८ यांना प्रतिवादी म्हणून सामील करणेची परवानगी मागितली आहे. तसेच दाव्याचे टायटलमध्ये दावा विषयाची किंमत र.रु.२१.६८ + र.रु.२,००,०००/- +र.रु.१,०००/- नंतर ''+१,०००'' तसेच र.रु.२,०१,०२१.६८ पैसे ऐवजी ''र.रु.२,०२,०२१.६८ पैसे'' अशी दुरुस्ती करणेस, तसेच दावा कलम ५(अ) नंतर ५(ब) असे नमुद करुन त्यामध्ये ''प्रस्तुतचा दावा न्यायप्रविष्ट असताना, यातील प्रतिवादी नं.६ यांनी बेकायदेशीररित्या दावा कलम १(अ) मधील गट नं.९३ या मिळकतीपैकी दक्षिण बाजूकडील हे.०-८५ आर या मिळकतीपैकी उत्तर बाजूकडील आठ आणे हिस्सेची मिळकत म्हणजेच हे.०-४२.५० आर ची मिळकत प्रतिवादी नं.७ व ८ यांना दि.२०/०८/२०२१ रोजी रजि.दस्त क्र.४२३३/२०२१ अन्वये तथाकथित नोंदखरेदीपत्राने खरेदी दिली असलेचे यातील वादींना नुकतेच समजून आलेले आहे. तथाकथित खरेदीपत्र पोकळ व मुलतः बेकायदेशीर असून ते वादीच्या हिस्सेवर बंधनकारक नाही असे जाहीर होऊन मिळणेकरिता सदरचा दावा दाखल केलेला आहे.'' असा मजकूर समाविष्ट करणेकरिता, तसेच दावा कलम ८ मधील ७ व्या ओळीमध्ये १,०००/- या नंतर +१,००० असे नमुद करणेकरिता तसेच दावा कलम ९ मध्ये ई नंतर उ असे नमूद करुन त्यामध्ये ''यातील प्रतिवादी नं.६ यांनी

प्रतिवादी नं.७ व ८ यांना दावा कलम १(अ) मधील मिळकतीचे दि.२०/०८/२०२१ रोजी रजि.दस्त क्र.४२३३ अन्वये करुन दिलेले तथाकथित खरेदीपत्र बोगस, बेकायदेशीर असून ते वादीचे हिस्सेवर बंधनकारक नाही असे जाहीर होऊन मिळावे'' असा मजकूर समाविष्ट करणेकामी व तशी दुरुस्तीची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने चुकीची, रचनात्मक व बेकायदेशीर असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेची त्यांनी विनंती केली आहे.

**५.** प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीं विरुध्द वाटपाकरिता व जाहीर होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे. त्यानुसार वादींना त्यांचे दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. अर्जामधील कथने वादीने शपथेवर सांगितलेली आहेत. तथापि, वादी मागत असलेली दुरुस्ती ही भविष्यातील दावे, प्रतिदावे टाळण्यासाठी व दाव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक वाटते. तसेच सदरची दुरुस्ती ही प्रतिवादी नं.६ यांनी केलेल्या तथाकथित खरेदीपत्राच्या अनुषंगाने आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ रचनेत तसेच उददेशामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट त्यांना त्यांची बाजू मांडून बचाव घेण्याची संधी मिळणार आहे. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने मागणी केल्याप्रमाणे दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी व तशी दुरुस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2023.03.21 16:49:31 +05'30'

मिरज.

**( नि.बा. चव्हाण )**

दि. २०/०३/२०२३

४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मिरज.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 20.03.2023. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 20.03.2023. |
| Order uploaded on. | : | 21.03.2023. |